सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-०८१८/प्र.क्र.३००/विदेशी-१, दि.२५ मार्च २०२५

**विषय :-** विदेशी कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमांना ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-०८१८/प्र.क्र.३००/विदेशी-१, दि.२५ मार्च २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगण क सांकेतांक २०२५०३२५१४२७३८८५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 26-03-2025 21:38:57

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
सर्व पोलीस आयुक्त(बृहन्मुंबई वगळून)
सर्व पोलीस अधीक्षक
कार्यासन अधिकारी का.क्र.१ व २०

प्रत:-

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना.), महाराष्ट्र राज्य मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक. (का.व सु.), महाराष्ट्र राज्य मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक. (आस्थापना.), महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक,कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**विदेशी कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमांना ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्र.- संकीर्ण-०८१८/प्र.क्र.-३००/विदेशी-१**
नविन प्रशासकीय इमारत,९ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय,मुंबई-३२.
दिनांक- २५ मार्च २०२५.

---

**वाचा :-**

१) शासन परिपत्रक,गृह विभाग क्र.- संकीर्ण-०८१८/प्र.क्र.-३००/विदेशी-१ दि. २३.०८.२०१८
२) शासन परिपत्रक,गृह विभाग क्र.- संकीर्ण-०८१८/प्र.क्र.-३००/विदेशी-१ दि. १५/९/२०१८.
३) CIRCULAR NO.3/05 NO.25022/18/5-FI, MINISTRY OF HOME AFFAIRS, GOVERMENT OF INDIA यांचे दिनांक ०५.४.२००५ रोजीचे शासन परिपत्रक

# शासन परिपत्रक

राज्यात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये विदेशी कलाकारांचा सहभाग असल्यास संबंधित आयोजक संस्थांना भारत सरकारच्या सुचनेनुसार ना-हरकत प्रमाणपत्र राज्य शासनाच्या गृह विभागामार्फत देण्यात येते. सदर परवानगी प्राप्त करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे आहे.

**शासन परिपत्रक :-**

१. परकीय नागरिकांस कार्यक्रमात सहभागी होण्यास अधिकृत Event Management Company कडे कलाकार म्हणून नोंदणीकृत असणे आवश्यक असून त्या परकीय नागरिकाविरुध्द पोलीस रेकॉर्ड मध्ये कुठल्याही प्रकारची आक्षेपार्ह बाब असू नये. तसेच सदर परकीय नागरिकांनी देशात कला सादर करताना येथील कायदा व नियमांचे पालन करुन कला सादर करणे आवश्यक राहील. सदर परदेशी नागरिक हा B,E किंवा X Visa प्राप्त असावा किंवा OCI Card धारक असणे आवश्यक राहील. देशात परकीय नागरिकांविपयीचा संबंधित Data प्रादेशिक विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी तथा पोलीस उपायुक्त विशेप शाखा-२, मुंबई यांच्याकडे एकत्रितरित्या उपलब्ध असतो. गृह विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या मार्फत परेदशी नागरिकांस कार्यक्रमात सहभागी होण्याची परवानगी देण्यात येईल. तथापि कार्यक्रम आयोजकास स्थानिक प्रशासन/पोलीसांकडून इतर परवानग्या घेणे आवश्यक असेल. प्रादेशिक विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी तथा पोलीस उपायुक्त विशेप शाखा-२, मुंबई याच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र आल्यानंतरच परकीय नागरीकांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमास परवानगी देण्यात येईल.

२. विदेशी कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमाकरिता आयोजकांनी कार्यक्रमाच्या किमान ८ कार्यालयीन दिवस अगोदर गृह विभागाच्या asoforeign1.efa-mh@gov.in या इमेल वर सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज सादर करावा. तसेच प्रादेशिक विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी तथा पोलीस उपायुक्त विशेप शाखा-२, मुंबई यांच्या fsc.mum-ivfrt@gov.in व frromum@nic.in या इमेल वर सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. प्रादेशिक विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी तथा पोलीस उपायुक्त विशेप शाखा-२, मुंबई यांनी ना-हरकत प्रमाणपत्राबाबत गृह विभागाकडून अहवाल मागविल्यावर ३ दिवसाच्या आत सदर अहवाल शासनास सादर करावा.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना राज्यातील कोणत्याही कार्यक्रमात विदेशी कलाकार सहभागी होणार असल्यास सदर कार्यक्रमास कार्यक्रम आयोजकांनी शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याबाबत सूचना द्याव्यात जेणेकरुन राज्यात एकही कार्यक्रम विनापरवाना पार पडणार नाही.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२५०३२५१४२७३८८५२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAHUL VIJAY KULKARNI

Digitally signed by RAHUL VIJAY KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=019d1a40755cacf50cb371c432c67afaec7da5aad928d966ad4270c6a4f1ac39, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=31493D4A6291F531ED8FD00972CCBFA0376623C7F6C38C3B848BFBE06685A219, cn=RAHUL VIJAY KULKARNI
Date: 2025.03.25 14:28:28 +05'30'

**( रा. वि. कुलकर्णी )**
**सह सचिव,गृह विभाग.**

**प्रति,**

१)पोलीस महासंचालक,मुंबई. (यांच्यामार्फत सर्व पोलीस आयुक्त तसेच सर्व पोलीस अधिक्षक)

२) पोलीस आयुक्त, मुंबई.

३) प्रादेशिक विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी, मुंबई.

४) सर्व विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

५) वरीष्ठ स्वीय सहायक, अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) वरीष्ठ स्वीय सहायक, प्रधान सचिव (विशेप), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) सर्व आयोजक संस्था.

८) निवडनस्ती (विदेशी-१ कार्यासन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.